# बृहन्मुंबई महानगरपालिका

## सार्वजनिक आरोग्य खाते

### कीटकनाशक विभाग

## जाहिरात

बृहन्मुंबई महानगरपालिकेतील सार्वजनिक आरोग्य खात्याच्या अखत्यारितील कीटकनाशक विभागाच्या अंतर्गत येणा-या कीटक नियंत्रण ए ते टी विभागांकरिता **“कंत्राटी कीटक नियंत्रण अधिकारी”** ही पदे तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी पध्दतीने भरावयाची आहेत. त्याकरिता अर्हताधारक उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अनु क्र. | पदाचे नाव | भरावयाची पदे | प्रतिक्षायादीकरिता पदे |
|---|---|---|---|
| १ | **“कंत्राटी कीटक नियंत्रण अधिकारी”** | ६ | ३ |

**अ)** **“कंत्राटी कीटक नियंत्रण अधिकारी”** या पदाची अर्हता खालीलप्रमाणे आहे.

१) उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापिठाचा **M.Sc.(Entomology)** कीटकशास्त्र किंवा **M.Sc. (Zoology)** प्राणीशास्त्र विषयातील पदव्युत्तर पदवीधारक असावा.

२) उमेदवार माध्यमिक शालांत प्रमाणपत्र किंवा तत्सम किंवा उच्चतम परिक्षेत किमान १०० गुणांची प्रश्नपत्रिका असलेला मराठी विषय घेऊन उत्तीर्ण झालेला असावा.

३) उमेदवारांना संगणक विषयक ज्ञान अवगत करणे आवश्यक आहे. उमेदवाराने डीओईएसीसी सोसायटीचे ‘सीसीसी’ किंवा ‘ओ’ स्तर किंवा ‘ए’ स्तर किंवा ‘बी’ स्तर किंवा ‘सी स्तर’ स्तरावरील प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य उच्च आणि तांत्रिक शिक्षण मंडळाचे ‘एमएससीआयटी ’ किंवा ‘जीईसीटी ’ चे प्रमाणपत्र धारण केलेले असावे.

**ब)** **मानधन :-**

**“कंत्राटी कीटक नियंत्रण अधिकारी”** यांना रु.४०,०००/- प्रति महिना इतके निश्चित मानधन देण्यात येईल. याव्यतीरिक्त अन्य कोणत्याही प्रकारचे भत्ते देय असणार नाहीत. सदर कंत्राटी सेवेचा कालावधी फक्त ६ महिने म्हणजे १७९ दिवसांचा राहील.

**क)** **वयोमर्यादा :-**

उमेदवाराचे वय दि.०१.०८.२०२४ रोजी १८ वर्षापेक्षा कमी व ३३ वर्षापेक्षा जास्त असता कामा नये.

**ड) <u>निवडीचे निकष :-</u>**

१) उमेदवाराची निवड करताना मान्यताप्राप्त विद्यापिठाची **M.Sc.(Entomology)** कीटकशास्त्र किंवा **M.Sc.(Zoology)** प्राणीशास्त्र विषयातील पदव्युत्तर पदवी परीक्षेत उच्चतम गुण प्राप्त झालेल्या उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल.

२) समान गुण धारण करणा-या अर्हता प्राप्त उमेदवारांना जन्मतारखेनुसार वयोज्येष्ठतेनुसार प्राधान्य देण्यात येईल.

३) उमेदवार शारीरिक दृष्टया सक्षम असणे अत्यंत गरजेचे आहे.

४) उमेदवाराची कमाल वयोमर्यादा ३३ वर्षे असावी.

तरी, विहीत अर्हताधारण करणा-या इच्छुक उमेदवारांनी विहीत नमुन्यातील आपले अर्ज साक्षांकीत केलेल्या प्रमाणपत्रांच्या प्रतींसह खालील ठिकाणी दि.०७.१०.२०२४ ते दि.०९.१०.२०२४ पर्यत सांयकांळी ०५.०० वाजेपर्यंत सादर करावेत. त्यानंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.)

**(<u>अर्ज प्रत्यक्ष येऊन जमा करावा.</u>)**

**(<u>पोस्टाने किंवा इतर मार्गाने प्राप्त होणा-या अर्जाचा विचार केला जाणार नाही</u>)**

**<u>उमेदवरांनी अर्ज करावयाचे ठिकाण-</u>**

<u>कीटकनाशक अधिकारी कार्यालय,</u>
५ वा मजला, हॉकर्स प्लाझा, जनता क्लॉथ मार्केट इमारत,
<u>सेनापती बापट मार्ग, दादर (पश्चिम), मुंबई – ४०००२८.</u>

आवश्यक असल्यास भरती प्रकीया महापालिका प्रशासनाकडून कधीही थांबवू किंवा पुढे ढकलली जाऊ शकते.

**ई) <u>कंत्राटी तत्वावर नियुक्त करावयाच्या "कंत्राटी कीटक नियंत्रण अधिकारी" या पदाकरिता अटी व शर्ती :-</u>**

१) कंत्राटी तत्वावर नियुक्त होणारा उमेदवार **"कंत्राटी कीटक नियंत्रण अधिकारी"** या तत्सम पदाकरिता विहीत केलेल्या अर्हता धारण करणारा असावा.

२) कंत्राटी तत्वावर नियुक्त होणा-या उमेदवारांना महानगरपालिकेच्या नियमीत सेवेसाठी हक्क सांगता येणार नाही.

३) कंत्राटी तत्वावर नियुक्त होणा-या उमेदवाराची उच्चतम वयोमर्यादा ३३ वर्षे राहील.

४) कंत्राटी तत्वावरील उमेदवारांना रु.४०,०००/- प्रति महिना इतके निश्चित मानधन देण्यात येईल. त्यांना अन्य कोणत्याही प्रकारचे भत्ते देय असणार नाहीत.

५) सदर पदे सहा महिन्यांच्या विशिष्ट कालावधीसाठीच म्हणजेच १७९ दिवसांसाठी असून, सदर पदे कालावधी संपल्यानंतर संपुष्टात येतील.

६) उमेदवाराने रु.५००/- च्या प्रतिज्ञापत्रावर करारनामा लिहून देणे अनिवार्य आहे. सदर प्रतिज्ञापत्रात **"कंत्राटी कीटक नियंत्रण अधिकारी"** या पदावर निवडलेल्या उमेदवारांनी नेमणूकीच्या विहीत कालावधीत विवक्षीत काम पूर्ण करण्याची जबाबदारी असल्याबाबत तसेच उमेदवाराविरुध्द कोणतेही न्यायालयीन प्रकरण अथवा फौजदारी गुन्हा नसल्याबाबत हमी देणे अनिवार्य आहे.

७) अर्ज विहीत नमुन्यात स्वहस्ताक्षरात/टंकलिखीत स्वरूपात सर्व दृष्टीने पुर्ण असावेत. विहीत नमून्यामध्ये नसलेले व अपूर्ण अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

८) अलिकडच्या काळात काढलेले पारपत्र आकारातील उमेदवाराचे छायाचित्र त्याच्या स्वाक्षरीसह अर्जावर नमूद केलेल्या ठिकाणी चिटकवावे. त्याच छायाचित्राच्या दोन अतिरिक्त प्रती पुढील निवड प्रक्रीयेसाठी उमेदवाराजवळ ठेवणे आवश्यक आहे.

९) अर्जासाठी वापरण्यात येणारे कागद चांगल्या प्रतीचे लिगल (Legal) आकारातील असावे.

१०) उमेदवारांनी स्वत: निश्चित करावयाचे आहे की ते आवेदित सर्व अर्हता व अटी पूर्ण करतात. उमेदवार विहीत अर्हता व अटी पूर्ण करीत नसल्याचे कोणत्याही क्षणी निदर्शनास आल्यास त्याची उमेदवारी रद्द करण्यात येईल.

११) पत्रव्यवहाराचा पत्ता सुस्पष्ट व पूर्ण असावा.

१२) उमेदवाराने शैक्षणिक अर्हतेबाबतची प्रमाणपत्रे, व्यावसायिक अर्हता, संबधीत गुणपत्रिका, अनुभवाचे प्रमाणपत्र, त्यांच्या मुळ प्रती व साक्षांकीत छायांकीत प्रतीसह उपस्थित रहावे.

१३) उमेदवारांना निवडीच्या ठिकाणी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

१४) निवड प्रक्रीया सुरू झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने चुकीची माहिती/प्रमाणपत्रे/कागदपत्रे सादर केल्याचे किंवा कोणतीही माहिती लपवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्यांची उमेदवारी रद्दबातल करण्यात येईल. तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्व सूचना न देता त्यांची कंत्राटी नियुक्ती समाप्त करण्यात येईल.

१५) निवड झालेल्या उमेदवाराला नियुक्ती नंतर मुंबई महानगरपालिका (सेवा) नियम १९८९ तसेच बृहन्मुंबई महानगरपालिका सेवा (वर्तणूक) नियम १९९९ लागू होणार नाहीत.

**फ) विशेष सुचना :-**

१) सदर कंत्राटी पध्दतीचा कालावधी फक्त ६ महिन्याचा म्हणजेच १७९ दिवसांचा राहील.

२) कंत्राटी पध्दतीवर नेमणूक केलेल्या उमदेवारांची सेवा त्यांना पूर्व सुचना न देता संपुष्टात आणण्याचे अधिकार प्रशासनास राहतील.

३) कंत्राटी कालावधीत काम करणा-या उमेदवारांची सेवा तात्पुरत्या स्वरुपाची असल्याने त्यांची सदर सेवा सेवाज्येष्ठतेसाठी विचारात घेतली जाणार नाही. सदर सेवेला सेवाज्येष्ठतेसाठी प्राधान्य देण्यात येणार नाही.

४) निवड झालेल्या उमेदवारांना संबंधित पदावर नियुक्ती करण्यापूर्वी सोबत जोडलेल्या करारनाम्याच्या नमुन्याप्रमाणे रु.५०० च्या प्रतिज्ञापत्रावर करारनामा द्यावा लागेल.

५) जाहिरातीपूर्वी या कार्यालयात व अन्य ठिकाणी सादर केलेले व पोष्टाने प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेने कोणत्याही व्यक्तीला व इतर दुस-या संस्थेला अर्ज विकणे, स्विकारणे इत्यांदीचा अधिकार दिलेला नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

६) जर एखाद्या उमेदवाराने भरतीच्या कोणत्याही टप्यावर दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास किंवा अनुचित माध्यमांचा अवलंब केल्याचे किंवा तोतया व्यक्तीची व्यवस्था केल्याचे आढळल्यास त्याला निवडीतून अपात्र ठरविण्यात येईल.

७) मध्यस्थ / ठक / मुंबई महानगरपालिकेत संबंध असल्याचे भासविणा-या व्यक्ती यांचा गैरमार्गाने नोकरी मिळवून देण्याच्या आश्वासनापासून सावध राहण्याच्या उमेदवारांना सूचना देण्यात येत आहेत.

८) प्रशासकीय किंवा अन्य कारणास्तव भरती प्रक्रिया कोणत्याही वेळेस किंवा कोणत्याही टप्यावर थांबविण्याचे अधिकार प्रशासनाकडे राहतील.

९) गुणवत्तेनुसार स्थानिक उमेदवारांचा प्राधान्याने विचार करण्यात येईल परंतू अंतिम निर्णय प्रशासनाचा राहील.

१०) उमेदवाराने एकदा अर्ज केल्यानंतर विहित वेळ समाप्त झाल्यानंतर कोणतीही कागदपत्रे नंतर आणून दिल्यास ती कागदपत्रे ग्राहय धरली जाणार नाहीत व त्याचा अर्ज अपूर्ण समजून अपात्र ठरविण्यात येईल.

सही/-

(डॉ.दक्षा शाह)

**कार्यकारी आरोग्य अधिकारी**

# बृहन्मुंबई महानगरपालिका
## सार्वजनिक आरोग्य खाते
## कीटकनाशक विभाग
## <u>अर्जाचा नमुना</u>

उमेदवाराने त्यांच्या अलिकडे काढलेले पारपत्र आकाराचे छायाचित्र लावून फोटोवर स्वाक्षरी करावी.

**पदाचे नाव :- कंत्राटी कीटक नियंत्रण अधिकारी**

१. अ)संपुर्ण नाव (आडनाव प्रथम) (मराठीत) : -------------------------------------------------

ब)वडिलांचे / पतीचे संपुर्ण नाव : -------------------------------------------------

क)विवाहापुर्वीचे संपुर्ण नाव (महिलांकरिता) : -------------------------------------------------

२. पत्ता व दुरध्वनी /मोबाईल क्र./ई-मेल आयडी :-----------------------------------------------------

-----------------------------------------------------

-----------------------------------------------------

-----------------------------------------------------

-----------------------------------------------------

-----------------------------------------------------

-----------------------------------------------------

-----------------------------------------------------

३. जात प्रवर्ग :-----------------------------------------------------

४. लिंग: पुरुष :- [ ] स्त्री :- [ ]

५. अ) जन्म दिनांक दिनांक महिना वर्ष

ब) दि.०१.०८.२०२४ रोजी असलेले वय ---------- वर्षे --------------- महिने -------------दिवस

६. शैक्षणिक अर्हता:-

| शैक्षणिक अर्हता | शालांत परिक्षा मंडळ/ विद्यापीठाचे नाव | गुणांचा तपशिल | टक्केवारी | शालांत परिक्षेतील गुण |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

७. संगणक विषयक ज्ञान: MS-CIT किंवा शासनाने विहित केलेल्या संगणक विषयक अभ्यासक्रमाचे प्रमाणपत्र क्रमांक :- -----------------------------

८. स्थानिक पोलिस ठाण्याचा संपुर्ण पत्ता : -----------------------------------------------------

-----------------------------------------------------

दिनांक :-

ठिकाण :-

आपला / आपली विश्वासू,

(अर्जदाराची सही/-)

(अर्जदाराचे नाव )